# वेदांता लिमिटेड
# कार्पोरेट सामाजिक दायित्व (सीएसआर) धोरण

## A. धोरण उद्दिष्ट

वेदांता लिमिटेड ('व्हीईडीएल' किंवा 'कंपनी') आपला व्यवसाय सामाजिकदृष्ट्या जबाबदार, नैत्क आणि पर्यावरण अनुकूल पद्धतीने संचालित करण्यास आणि तिच्या कार्यक्षेत्रातील आणि त्याच्या भोवतीच्या परिसरातील समुदायांच्या जीनवमानाची गुणवत्ता सुधारण्यासाठी सतत काम करण्यास बांधील आहे. वरील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आणि कंपनी सातत्यपूर्ण आणि अनुपालन तत्त्वावर काम करते याची सुनिश्चिती करण्यासाठी हे धोरण मार्गदर्शन करते.

## B. व्हीईडीएल सीएसआर तत्त्वज्ञान

वेदांता लिमिटेडमध्ये आमचा एक सुस्थापित इतिहास आहे आणि आमच्या शेजारी समिदायाच्या आणि राष्ट्राच्या सामाजिक हितासाठी पुनःगुंतवणूक करण्याची बांधिलकी आहे.

### सीएसआर दूरदृष्टी

*"शाश्वत आणि समावेशक वाढीच्या माध्यमातून समुदाय सबळ करणे, जीवनांमध्ये परिवर्तन करणे आणि राष्ट्र उभारणी सुलभ करणे."*

आम्हाला विश्वास आहे की

- राष्ट्रीय आणि राज्य सरकार भागीदारीतून तसेच स्थानिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय भागीदारांच्या भागीदारीतून देशाच्या एकात्मिक आणि समावेशक विकास प्रत्यक्षात साकार करण्यासाठी आम्ही सकारात्मक प्रभाव टाकू शकतो आणि योगदान देऊ शकतो;
- आमच्या व्यवसायांचा शाश्वत विकास आमच्या भागधारकांशी, विशेषतः आमही ज्या समुदायासोबत काम करतो त्यांच्याशी असलेल्या शाश्वत, दीर्घकाळ टिकणाऱ्या आणि परस्परांच्या लाभदायक नात्यावर अवलंबून आहे.
- सरकार, कॉर्पोरेट्स आणि नागरी संस्था/सामुदायिक संस्थांसोबत भागीदारी, प्रयत्नांना पूरक, संसाधने आणि शाश्वत उपाय तयार करण्यासाठी एक मजबूत गुणक देतात;
- आमच्या कर्मचाऱ्यांमध्ये केवळ आमच्या व्यवसायासाथीच नव्हे तर मजबूत समाज निर्मितीसाठीही योगदान देण्याची क्षमता आहे.

## C. विषयकेंद्री लक्ष क्षेत्रे

आमचे कार्यक्रम दारिद्र्य निर्मूलन, विशेषत: एकात्मिक विकास कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करतात, ज्याचा बेसलाइन आणि गरजेचे मूल्यांकन, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विकास अजेंडाच्या अनुषंगाने संपूर्ण सामाजिक-आर्थिक वाढ आणि लोकांच्या सबलीकरणावर परिणाम होतो, .
भर दिले जाणारे प्रमुख क्षेत्र असतील -

a) मुलांचे कल्याण व शिक्षण
b) महिला सशक्तीकरण
c) आरोग्यसेवा
d) पेयजल व स्वच्छता
e) शाश्वत शेती व पशू कल्याण
f) युवकांना बाजारपेठ संलग्न कौशल्य प्रदान करणे
g) पर्यावरण संरक्षण व पुनःस्थापना
h) क्रीडा व संस्कृती
i) सामाजिक पायाभूत सुविधांचा विकास
j) आपत्ती शमन, बचाव, मदत आणि पुनर्वसन यासह राष्ट्रीय महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये सहभाग

सीएसआर उपक्रम कंपनी कायद्याच्या अनुसूची VII मध्ये निर्दिष्ट क्रियाकलापांच्या अनुषंगाने आहेत. कंपनीच्या सीएसआर समितीच्या शिफारसींनुसार वरील बाबींमध्ये वेळोवेळी सुधारणा केली जाऊ शकते.

कंपनीच्या सीएसआर उपक्रमांतून निर्माण होणारी अतिरिक्त रक्कम कंपनीच्या व्यावसायिक नफ्याचा भाग बनणार नाही आणि कोणतीही न खर्च केलेली रक्कम (उक्त आर्थिक वर्षांतील अतिरिक्त खर्च केल्यानंतर) चालू असलेल्या / नसलेल्या प्रकल्पामध्ये वर्गीकृत केली जाईल आणि कायद्याच्या आवश्यकतेनुसार एस्क्रो/निधीत जमा केली जाईल.

## D. प्रकल्प निवड आणि अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्वे

प्रत्येक तीन वर्षांनी केलेले बेसलाईन सर्वेक्षण आणि गरज मूल्यांकनाच्या शिफारशींवर सीएसआर प्रकल्प आधारलेला असेल.

वेदांतामध्ये आम्ही आपला सीएसआर कार्यक्रम पार पाडण्यासाठी पुढील अंमलबजावणी मॉडेल्सचे अनुपालन करतो.

- नागरी समिती/स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक आणि प्रशिक्षण संस्था, कार्पोरेट्स, सरकार आणि सामाजिक गट अशा तृतीय पक्षांशी भागीदारी करुन
- वेदांताद्वारे इन हाऊस अंमलबजावणी - प्रकल्पाची रचना आणि वितरणासह.

## E. प्रशासन - पुनरावलोकन, देखरेख यंत्रणा आणि वार्षिक कृती योजना तयार करणे

प्रकल्पाच्या संपूर्ण जीवन चक्रात आम्ही आमच्या प्रक्रियांना वेदांत तांत्रिक मानकांसह संरेखित करतो. बहु-स्तरीय प्रशासन यंत्रणा प्रकल्पांचे समीक्षात्मक मूल्यमापन करण्यास आणि आवश्यक असेल तेव्हा आवश्यक सुधारणा करण्यासाठी टीम्सना सक्षम करते. यामध्ये समावेश आहे:

- नियतकालिक आधारावर सीएसआर टीम्सद्वारे अंतर्गत पुनरावलोकन
- प्रकल्पाला दिशा देण्यासाठी आणि नवीन संधी शोधण्यासाठी सीएसआर एक्सको आणि मॅन्कॉम पुनरावलोकन
- स्वतंत्र संस्थेच्या माध्यमातून दर तीन वर्षांनी बेसलाईन आणि गरज मूल्यमापन
- प्रकल्प / कार्यक्रमांचे कायद्याच्या व्यवहार्यतेनुसार किंवा स्वतंत्र संस्थेद्वारे प्रकल्प/कार्यक्रम पूर्ण झाल्यावर प्रभावाचे मूल्यांकन.

कंपनीची सीएसआर समिती, जी वार्षिक सीएसआर नियोजन/अर्थसंकल्पाला मंजुरी देण्यासाठी वर्षातून दोन वेळा बैठक आयोजित करेल ती मंडळाच्या धोरणानुसरा सीएसआर उपक्रम हाती घेतले जात असल्याची सुनिश्चिती करेल आणि प्रकल्पाच्या प्रगतीचे मूल्यमापन करेल.

गरजांचे मूल्यमापन आणि बेसलाईन सर्वेक्षण अहवालावर आधारित निवडलेल्या प्रकल्पाच्या आधारावर वार्षिक कृती आराखडा असेल.

## F. लेखापरीक्षण

सर्व सीएसआर उपक्रम आणि त्यावर केलेले खर्च नियुक्त लेखापरीक्षकाद्वारे लेखापरीक्षणाच्या अधीन असतील. कंपनीची सीएसआर समिति कंपनी कायदा, 2013 अंतर्गत सीएसआर नियमांच्या लागू तरतुदींच्या आवश्यकतेचे पालन आणि त्यामधील सुधारणांचे पुनरावलोकन करेल.

## G. संप्रेषण

आम्ही नियतकालिक तत्त्वावर आमच्या भागधारकांना आमच्या सामाजिक कार्यांची फलनिष्पत्ती स्वेच्छेने कळवत जावू.

## H. दायित्व

या धोरणाचे पालन करण्याची जबाबदारी सीएसआर समिती, संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, वरिष्ठ व्यवस्थापक आणि व्हीडीईएल साठी काम करणारे सर्व कर्मचारी आणि सल्लागार यांच्यावर आहे.

## I. धोरणाचे पुनरावलोकन

सीएसआर धोरणाचे दर तीन वर्षांनी किंवा कंपनीच्या सीएसआर समितीने शिफारस केल्यानुसार पुनरावलोकन केले जाईल.

Sensitivity: Internal (C3)

## परिशिष्ट 1

## वेदांता लिमिटेडमध्ये सीएसआर उपक्रम

### शिक्षण

1. नंद घर
2. ई-कक्षा
3. वेदांता डीएव्ही शिष्यवृत्ती कार्यक्रम
4. उंची उडान
5. वेदांता विदार्थी विकास योजना
6. शिष्यवृत्ती
7. वेदांता लघु विज्ञान प्रयोगशाळा प्रकल्प
8. बाल संगोपन प्रकल्प
9. मध्यान्ह भोजन
10. संध्याकालीन अभ्यास केंद्र
11. प्रकल्प प्रेरणा
12. एकात्मिक शाळा विकास
13. अर्ली चाइल्डहुड डेव्हलपमेंट सेंटर्स (प्रारंभिक बालपण विकास केंद्र)
14. बाल व युवा सेवा केंद्र
15. प्रोजेक्ट कनेक्ट

### शाश्वत उपजिविका

1. पार्यायी उपजीविका संधी प्रकल्प
2. ग्रामनिर्माण
3. तमिता मिथुकल - युवकांचा कौशल्य विकास
4. विविध कृषी व गैर-कृषी उपक्रमांच्या माध्यमातून उपजीविकांचा प्रचार
5. प्रकल्प उन्नती - पावसाचे पाणी साठवून पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करणे व शेतीला चालना
6. आकांक्षी जिल्हा कार्यक्रम (नीती आयोग)
7. शेती आधारीत उपजीविकेसाठी प्रकल्प जीविका
8. पशुसंवर्धन
9. बायोमास उर्जा निर्मिती
10. समाधान - कृषी व पशुधन विकास
11. प्रकल्प जीविका आणि वाडी
12. व्यापक आधार असलेला उपजीविका कार्यक्रम
13. प्रकल्प उन्नती फ्रेश
14. प्रकल्प जमीन व जल व्यवस्थापन
15. नवी दिशा - शाश्वत शेतीचा प्रचार

### आरोग्य

1. बाल्को वैद्यकीय केंद्र
2. वेदांता हॉस्पीटल / कंपनीद्वारे चालवलेले हॉस्पीटल्स
3. मोबाईल मेडिकल युनिट्स
4. कम्युनिटी मेडिकल सेंटर्स
5. विशेष आरोग्य शिबिरे
6. नेत्र-आरोग्य सेवा
7. पेयजल प्रकल्प
8. घरगुती स्वच्छता
9. प्रकल्प आरोग्य
10. प्रकल्प मासिक पाळी आरोग्य व्यवस्थापन

**कौशल्य प्रशिक्षण**

1. केर्न एन्तरप्राइज सेंतर बारमेर
2. सेसा टेक्निकल स्कूल
3. कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र
4. संगणक साक्षरता केंद्र
5. वेदांता ईएसएल स्किल स्कूल
6. वेदांता स्किल स्कूल

**सखी - महिला सक्षमीकरण**

1. सखी - महिला सक्षमीकरण
2. शुभलक्ष्मी सहकारी - महिलांसाठी उपजीविका
3. प्रकल्प उन्नती - महिलांचे सबलीकरण

**क्रीडा व संस्कृती**

1. सेसा फुटबॉल अकादमी
2. झिंक फुटबॉल अकादमी
3. प्रकल्प द्रोणाचार्य - ईएसएल आर्चरी अकादमी
4. समाजासाठी क्रीडा स्पर्धांना पाठिंबा व मदत
5. समाजासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन
6. सांस्कृतिक वारशाचा प्रचार

**पर्यावरण**

1. तलाव, सिंचन वाहिन्यांच्या स्वच्छतेसाठी मदत
2. वृक्ष लागवड
3. पाणी साठवण संरचना
4. सामाजिक वनीकरण आणि जैवविविधता

**समुदाय विकास**

अप्रोच रोड, सामुदायिक/सामाजिक इमारती, शाळांचे श्रेणीवर्धन, स्वच्छता सुविधा इत्यादीसारख्या सामुदायिक मालमत्तांची निर्मिती.

Sensitivity: Internal (C3)